ISSN 2277-8063

# आंतरराष्ट्रीय राजकारण आणि पर्यावरणीय समस्या

प्रा. डी.डी. ठाकरे
राज्यशास्त्र विभाग मविप्र कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदगाव (नाशिक)

**सारांश** : आज जगामध्ये मोठ्या प्रमाणात पसरलेल्या प्रदुषणामुळे पर्यावरणीय प्रश्न गंभीर झाला आहे. जगातील वाढती लोकसंख्या, पाण्याचे प्रदूषण, वायू प्रदूषण, भूमी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम झाला आहे. प्रदूषणामुळे जगात ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्याचा परिणाम सर्वच राष्ट्रांवर होताना दिसतो. आपल्या राज्याच्या परिसरात प्रदूषणापासून संरक्षणाची दक्षता घेणे हे आंतरराष्ट्रीय कायद्यांतर्गत सर्व राज्याचे कर्तव्य असते. त्याचा इतर राज्यावरही परिणाम होतो. यामुळे हा प्रश्न आता जागतिक बनला आहे. पर्यावरण हा विषय आता जागतिक स्तरावर राजकारणाचा विषय झाला आहे. विशेषत: विकसित देश या प्रश्नावर राजकारण करताना दिसतात.

**प्रस्तावना** : दुसऱ्या महायुद्धानंतर औद्योगिकिकरणाचा वेग वाढला आणि त्याच वेगाने पर्यावरणाचे मुद्देही समोर येण्यास सुरुवात झाली. पर्यावरणावरील परिणामाचा थेट फटका मानवी समाजाला बसत असल्याने या मुद्द्यांना सामाजिक आणि राजकीय आयाम आले. यातून १९६०– ७० च्या दशकामध्ये ग्रीनपीस, ग्रीन नेटवर्क, फ्रेंड्स ऑफ अर्थ या संघटना आकाराला आल्या नव्याने उदयाला पर्यावरणवाद्याचा रेटा वाढत गेला. तशी आंतरराष्ट्रीय व्यासपीठालाही दखल घ्यावी लागली. यातून १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रांची पहिली मानव पर्यावरण परिषद झाली. याच व्यासपीठावरून पहिल्यांदा विरळ होणाऱ्या ओझोनया थराचे वास्तव मान्य करण्यात आले. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून बळ मिळाल्यामुळे सर्वच देशात कमी अधिक प्रमाणात पर्यावरण चळवळी वाढण्यास सुरुवात झाली. १९८० च्या दशकात ग्रीन पॉलिटिक्स, इको ग्रीन्स, ग्रीन मुव्हमेंट यासारख्या चळवळी आकाराला आल्या. १९८० च्या दशकात घडलेली भोपाळमधील वायू गळती, चेर्नोबिलाच्या अणुभट्टीतील स्फोट, अलास्कामध्ये झालेली तेल गळती आणि आखाती युद्धात पेटवण्यात आलेल्या तेलविहिरी या घटना पर्यावरण चळवळीना आक्रमक होण्यास कारणीभूत ठरल्या. १९८९ मध्ये झालेल्या युरोपियन निवडणुकीमध्ये पहिल्यांदाच पर्यावरणाचा मुद्दा उचलण्यात आला. या निवडणुकात वेगवेगळ्या देशामध्ये विखुरलेल्या ग्रीन पक्षांनी एकत्रितपणे प्रचार केला. तेव्हापासून आजपर्यंत युरोपातील निवडणुकांमध्ये पर्यावरणाचे मुद्दे निर्णायक ठरत आहेत. १९८७ मध्ये झालेला क्यॉटो करार, १९९२ मधील रिओ करार व अनेक स्वयंसेवी संस्थांनी भाग घेतल्याने पर्यावरणीय प्रश्नाला जागतिक स्तरावर गती आली .

**उद्दिष्टे** : १)आंतरराष्ट्रीय राजकारणातील पर्यावरणीय समस्यांचा अभ्यास करणे
२)पर्या वरणीय प्रश्नचा जागतिक राजकारणावरील परिणामाचा अभ्यास करणे

**गृहीतके**
१)आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरणीय प्रश्नात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.
२)जागतिक पातळीवर पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रे एका व्यासपीठावर एकत्र येत आहेत.

**संशोधन पद्धती** : प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीय तथ्य सामग्रीचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने या विषयाशी संबंधित पुस्तके, संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रे व संकेत स्थळांचा आधार घेण्यात आला आहे. विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा आधार घेतला आहे.

**विषय विश्लेषण** : आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये पर्यावरणीय समस्यांना स्थान का मिळाले याची अनेक कारणे आहेत. आपणस ज्या पर्यावरणीय संकटांना सामोरे जावे लागते ते राष्ट्रीय सुरक्षेसाठीदेखील धोका आहे. पारंपरिक लष्करी धोक्यांप्रमाणे पर्यावरणीय ऱ्हास हा मानवी समाजाला घातकाच धोका आहे. संपूर्ण इतिहासात, पर्यावरणीय घटकांनी मानवी

Arts, Commerce & Science College Nandgaon (Nashik)
Principal
Arts, Commerce & Science College
Nandgaon, Dist. Nashik (M.H.)
Scanned by CamScanner

 ISSN 2277-8063

अस्तित्वाच्या सर्व बाबींसाठी गंभीर परिणाम दिले आहेत ज्यात महान संस्कृतींचा उदय आणि गती, संसर्गजन्य रोगांचा प्रसार, युद्ध आणि शांतता, आर्थिक उन्नती आणि भूक, स्थलांतर आणि पुनर्वसन, लोकसंख्या वाढ , आणि जागतिक असमानता अशा प्रकारे, शतकानुशतके वाढणाऱ्या पर्यावरणीय समस्या चिंताजनक आहेत. परंतु सध्याच्या जागतिक पर्यावरणीय समस्या बऱ्याच कारणांमुळे भूतकाळातील परिस्थितीपेक्षा भिन्न आहेत. समकालीन पर्यावरणीय समस्या त्यांच्या एकत्रित परिणामांमध्ये मुख्यत: जागतिक असतात. आंतरराष्ट्रीय राजकारणातील पर्यावरणविषयक प्रश्न पुढील प्रमाणे

**वातावरण**: वातावरणाशी संबंधित दोन समस्या आंतरराष्ट्रीय दृष्ट्या महत्वाच्या झाल्या आहेत. एक म्हणजे तापमानात वाढ आणि दुसरी ओझोनवायूचा स्थर विरळ होणे.

**अ)जागतिक तापमानातील होणारी वाढ** : औद्योगिकीकरणामुळे कार्बनडाय ऑक्साईड व इतर प्रदूषण करणारे वायू वातावरणात सोडले जातात. त्यामुळे तापमानात वाढ होत आहे. खनिज तेल, दगडी कोळसा, नैसर्गिक वायूचा इंधनासाठी वापर केल्याने या वायूची निर्मिती होत असते. हे वायू सूर्याची उष्णता शोषून घेतात त्यामुळे तापमानात वाढ होते याला ग्रीन हाउस गॅसेस म्हणतात. तापमान वाढीमुळे आर्टिक व अंटार्क्टिका वरील बर्फ वितळून महासागराच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन समुद्राच्या किनाऱ्यावरी शहरे पाण्याखाली जातील. बर्फ वितळून नद्यांना पूर येतील. नैसर्गिक पर्यावरण व्यवस्थेचा नाश होईल व शेती धोक्यात येईल.

**ब)ओझोन वायुचा स्थर विरळ होणे** : औद्योगिकिकरणामुळे काही विशिष्ट रसायने वातावरणात सोडली जातात. हि रसायने तरंगत वातावरणाच्या सर्वात वरच्या स्तरात येतात हि रसायने ओझोनवायूवर परिणाम करतात. सुगंधी वायूच्या फवारणीमध्ये वापरले जाणारे क्लोरोफ्लोरो कार्बन हे घटक द्रव्य याला मुख्य जबाबदार आहेत. ओझोन वायू सूर्याच्या अतिनील किरणांना शोषून घेतो. हा वायू कमी झाल्याने अतिनील किरणे थेट पृथ्वीवर येवून माणसावर व वनस्पतीवर त्याचा परिणाम होईल

**जैवीक विविधता** : जैविक विविधता म्हणजे पृथ्वीवरील वनस्पती व प्राण्यांच्या प्रजातीचे वैविध्ये यांच्यामुळे पृथ्वीवरील पर्यावरणीय व्यवस्था तयार होतात. अशा लाखो प्रजाती अस्तिवात आहेत. माणसाने केलेल्या पर्यावरणीय नाशामुळे असंख्य प्रजाती अगोदरच नष्ट झाल्या असून काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. प्रजातीतील गुंतागुंतीच्या परस्पर संबंधातून पर्यावरणीय व्यवस्थेचा समतोल निर्माण होत असतो. काही प्रजाती नष्ट झाल्यानंतर संपूर्ण पर्यावरणीय व्यवस्थेवर परिणाम होतो. परंतु पर्यावरणीय ऱ्हासाला कारणीभूत ठरणाऱ्या प्रक्रिया उद्योग हे आर्थिकदृष्ट्या काहीना लाभाचे असू शकतात म्हणजे हे उद्योग थांबवण्याचा काही प्रत्यक्ष किमंत असते. त्यामुळे हा प्रश्न सामाहिक हिताचा बनतो. मात्र जैवीक विविधता टिकवण्यासाठी करण्याची कृती हि देशाच्या किवा आंतरराष्ट्रीय पातळीवरची नसते. तर ती स्थानिक पातळीवरची असते. निर्णय हे मुख्य: देशांतर्गत असतात.

**जंगले आणि महासागर** : विषुववृतीय पर्जन्यवने आणि महासागरे जैवीक वैविध्ये आणि वातावरण हे देशासाठी महत्वाचे असतात. लाकूड आणि मासे यासारखे किमती साधन संपत्तीचे साठे त्यामध्ये असल्यामुळे त्यांचे महत्व वाढते. घनदाट पर्जन्य वने वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड कमी करून तापमानवाढ रोखण्याचे काम करतात.मोठे राष्ट्रही आपला स्वार्थ साधण्यासाठी जंगलाची मोठ्या प्रमाणात कत्तल करतात. या वनाच्या रक्षणासाठी श्रीमंत राष्ट्रांनी गरीब राष्ट्रांना आर्थिक मदत देऊ केली आहे. तरीही वनांचा नाश सुरु आहे आणि हा आंतरराष्ट्रीय पर्यावरण रक्षणासाठी महत्वाचा मुद्दा ठरलेला आहे त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात मासेमारी यावर प्रतिबंध करू शकत नाही. उलट सागरी किनाऱ्याची हद्दी वाढवून अधिकाधिक भाग राज्यांच्या सार्वभौम नियंत्रणाखाली आणण्याचा प्रयत्न झाला आहे.

**प्रदूषण** : प्रदूषण हा विषय बऱ्याच वेळा राज्याच्या किवा क्षेत्रीय स्तरावर हाताळला जातो. कारण प्रदूषणाची व्याप्ती व परिणाम बहुतेकवेळा मर्यादित स्वरूपाचे असतात. प्रदूषण जरी

Scanned by CamScanner

 ISSN 2277-8063

राज्याच्या सीमेपलीकडे पोहचत असेल तरी तो जागतिक सिमापलीकडे प्रश्न बनत नाही. वातावरणातील प्रदूषण रसायनामुळे आम्ल पर्जन्याचा प्रश्न हा देशाच्या सीमा ओलांडणारा असल्यामुळे क्षत्रिय पातळीवर देश एकत्र येऊन तो सोडवू शकतात. सन १९८८ मध्ये २४ युरोपियन देशांनी एकत्र येऊन नायट्रोजन ऑक्साईड हवेत सोडण्यावर मर्यादा आणल्या. आज विषारी आणि आण्विक कचऱ्याचे प्रदूषण एक गंभीर प्रश्न बनला आहे. कारण या प्रकारच्या प्रदूषणाचे परिणाम दीर्घकालीन व धोकादायक असतात.

**नैसर्गिक साधन संपत्ती** : खनिज संपत्ती हि देशाच्या अंतर्गत असल्याने तिच्यावर संबधित देशाचा अधिकार असतो. परंतु या संपत्तीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर संघर्ष होताना दिसतात. हि संपत्ती जगात सर्वत्र सारख्याच प्रमाणात उपलब्ध नसल्याने तिच्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी देशामध्ये स्पर्धा, संघर्ष व युद्धेही होतात. साधन संपत्तीच्या व्यापाराचे मोठ्या प्रमाणात राजकीयकरण झाले आहे. तेथे मक्तेदारी, किमतीसंदर्भात कारवाया करणे या गोष्टी नेहमीच घडताना दिसतात. जागतिक अर्थव्यवस्थेत उर्जा साधने महत्वाची भूमिका बजावतात. उर्जा साधनामध्ये तेलाचे महत्व अधिक आहे. यात आखाती देशांची मक्तेदारी आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर तेलाचे राजकारण केले जात आहे. तेलाप्रमाणेच पाणी हि नैसर्गिक साधन संपत्तीतील महत्वाचा घटक असून राष्ट्राचे औद्योगिकरण जेव्हढे वाढते तेव्हढी पाण्याची गरजही वाढते. पाणी हे पिण्यासाठी, शेती आणि उद्योगधंद्यासाठी आवश्यक नैसर्गिक साधन संपत्ती असून जगातील पाण्याच्या वापराचे प्रमाण वाढले आहे. पाण्याचा पुरवठा मर्यादित असल्यामुळे आणि पाणी साठे हे आंतरराष्ट्रीय सीमारेषा ओलांडत असल्याने पाण्यावरून होणारे संघर्ष जगभर वाढत आहेत. यात नद्यांच्या पाण्याचे वाटप, धरणे, कालवे हे प्रश्न देशामधील वादाचे बनले आहे.

**आंतरराष्ट्रीय सुरक्षा आणि पर्यावरण:**पर्यावरणाची हानी केवळ औद्योगिकीकरणामुळे झाली आहे हे जेव्हढे खरे आहे तेव्हढेच युद्धामुळे देखील पर्यावरणाची हानी होते. जी इतर होणाऱ्या हानी पेक्षा अधिक असते. व्हीयतनम युद्धात अमेरिकेने मोठ्या प्रमाणात पर्यावरण नष्ट करण्याची रसायनाचा वापर केला. या रसायनाचा परिणाम केवळ जंगलावर झाला नाही तर जवानाच्या आरोग्यावरही झाला. १९९० च्या आखाती युद्धात व २००२ च्या अमेरिका इराक युद्धात पर्यावरणाचा जाणीवपूर्वक ऱ्हास केला तेल विहिरींना लावलेल्या आगी हा युद्ध तंत्राचाच परिणाम होय.

**पर्यावरण संतुलनाचे प्रयत्न:**प्रदूषणाचे पर्यावरणावर अनुचित परिणाम होऊ लागल्याने सत्तरच्या दशकापासून प्रदूषणाच्या समस्येवर विचार केला जाऊ लागला आहे. १९७२ मध्ये स्टॉक होम येथे संयुक्त राष्ट्रामार्फत आयोजीत संमेलनात पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे त्यातून संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम जाहीर करण्यात आला. १९७३ मध्ये पश्चिम आफ्रिकेतील वाळवंटाच्या वाढत्या विस्तारावर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. १९८० मध्ये ओझोन गॅस सुरक्षित ठेवण्यासाठी विषारी गॅसच्या उत्सर्जनावर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने संधी केल्या. १९८० मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेमार्फत व विश्व आयोगाच्या पुढाकाराने वर्तमान व भावी पिढ्यांच्या कल्याणार्थ पर्यावरणाची संसाधने सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने निर्धार करण्यात आला. त्यासाठी कायम स्वरुपाची व्यवस्था असावी या विषयी रूपरेखा सादर करण्यात आली. १९९२ च्या रिओ डी जनरो येथील संमेलनात तापमान वाढ, जैव विविधता २१ अजेंड्यानुसार निरंतर विकास आयोग स्थापन करण्यात आले. १९९४ मध्ये जागतिक पर्यावरण सवलतीद्वारे पैसा पुरवण्यात येऊन पर्यावरण संतुलन राखण्याचा प्रयत्न झाला. जेफ संघटना जैवीक विविधता सुरक्षित ठेवण्याचे आणि जागतिक हवामान परिवर्तनावर लक्ष ठेवणे व पाणी संचयाच्या योजना राबवण्याचा प्रयत्न करते. जागतिक हवामान संघटना हवामानाचा अंदाज, हवामानातील स्थित्यांतरे आणि वादळाची पूर्व सूचना देते. १९९७ च्या शिखर संमेलनात वनसंरक्षण आणि मत्से संग्रहाकडे होत असलेल्या दुर्लक्षाकडे चिंता व्यक्त करण्यात आली परंतु कोणताही ठोस निर्णय घेण्यात आला नाही. १९९७ च्या क्वेटो संमेलनात जागतिक तापमान कमी करण्याच्या दृष्टीने ग्रीन हाउस गॅस उत्सर्जनावर नियंत्रणावर भर देण्यात आला. २०२० पर्यंत गॅस उत्सर्जन कमी

Scanned by CamScanner

करण्याचे मान्य झाले. २००२ च्या जोहन्सबर्ग पृथ्वी संमेलनात हवामान परिवर्तन रोखण्यासाठी हस्ताक्षराची कार्यवाही पूर्ण व्हावी असे ठरले. स्टॉकहोम परिषदेनंतरच्या वीस वर्षाच्या काळात पर्यावरण विषयक राजकारणाचा बराच विकास झाला. आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरणासंबंधीचे नियम संस्था आणि बहुराष्ट्रीय पातळीवरील पर्यावरण शास्रज्ञ व तज्ञ यांचे एक जाळेच निर्माण झाले. विकसित जगात ग्रीन पक्ष व ग्रीन चळवळी मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. विकसनशील देशामध्येही पर्यावरण विषयक चळवळी मोठ्या प्रमाणत सुरु झाल्या. या देशांच्या राजकीय बदलाच्या प्रक्रियेत तेथील चळवळी आघाडीवर होत्या. हळूहळू आंतरराष्ट्रीय पर्यावरण विषयक परिषदांमध्ये बिगर शासकीय संघटना सहभागी झाल्या. ग्रीन पीस, जागतिक वन्यजीव संघटना, पृथ्वी मित्र अशा संघटना महत्वाची भूमिका बजावतात.

स्पेन मध्ये माद्रिद येथे नुकतीच २ ते १३ डिसेंबर २०१९ रोजी झालेली जागतिक हवामान परिषद झाली. पण जागतिक तापमान वाढीवर कोणताही कार्यक्रम जाहीर न करताच सांगता झाली. दोनशे देशांदरम्यान दोन आठवडे चाललेल्या चर्चेतून कार्बन उत्सर्जनावर मर्यादा घालण्यासाठी आवश्यक उपाय योजनावर एकमत तयार करण्यात आंतरराष्ट्रीय समुदायाला अपयश आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण समस्यासंबंधी वेगवेगळी संमेलने झाली असली तरी गरीब श्रीमंत यातील भेदामुळे हि संमेलने फारशी यशस्वी झाली नाही. गरीब देश श्रीमंत राष्ट्रांकडून जास्त मदतीची अपेक्षा करत होते तर त्या बदल्यात श्रीमंत राष्ट्रे सर्वच राज्यात भ्रष्टाचार मुक्त लोकशाहीची स्थापनेची मागणी करत होते. हवामान परिवर्तनाच्या मुद्यांवर युरोपीय संघ आणि अमेरिकेत मतभेद होते. पॅरिस हवामान करारातून अमेरिका माघार घेत असल्याची सूचना अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पने नोव्हेंबर २०१९ रोजी संयुक्त राष्ट्रांना दिली. त्यामुळे अमेरिका या करारातून मुक्त होणार आहे. परिणामी कार्बन उत्सर्जन करण्यासंबंधी कोणतेही बंधन अमेरिकेवर राहणार नाही. अमेरिकेच्या दुटप्पी भूमिकेमुळे इतर राष्ट्रांनी कोणता आदर्श घ्यावा. यातून असे दिसते की, तापमान वाढ आणि प्रदूषण यांच्यापुढे माणूस हतबल झाला आहे काय? कळत पण वळत नाही अशी स्थिती झाली आहे काय? यातून बाहेर पडण्यासाठी उपाय कोणते? निसर्ग नियमाच्या प्रकाशात या समस्यांची स्पष्टीकरणे आणि उपाय शोधणे हि आजवर चाललेली अयशस्वी वाटचाल होय.

**समारोप** : मानव हाच सर्व विकासाचा केंद्रबिंदू असल्याने सर्वच मानवांना आरोग्यदायक जीवन जगण्याचा अधिकार आहे. प्रत्येक राज्याला आपले पर्यावरण संतुलन राखण्याचा अधिकार आहे. परंतु त्याचा विपरीत परिणाम इतर राज्यावर होणार नाही यांची काळजी घेतली पाहिजे. जागतिक पातळीवरील दारिद्रय दूर करण्यासाठी परस्परांना सहकार्य करण्याची गरज आहे. विश्व समुदायाचा कायम स्वरूपाचा विकास व लोकांचे जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीने प्रत्येक देशाने प्रदूषण पसरवणाऱ्या कृतीवर प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. त्याच बरोबर सर्व राज्यात विज्ञान तंत्रज्ञानाबाबत देवाण घेवाण झाली पाहिजे. सर्व नागरिकांनी पर्यावरण संतुलित राहील यासाठी प्रयत्न केले पाहिजे. देशपातळीवर व जागतिक स्तरावर शिक्षण व जनजागृती करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर आवश्यक ते कायदे करून त्याची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे. केवळ स्वार्थासाठी चाललेले राजकारण आता थांबवले पाहिजे. याचा परिणाम स्वत:वर देखील होणार आहे याचे भान ठेवले पाहिजे

**संदर्भ**


१) डॉ. वा. भा. पाटील, आंतरराष्ट्रीय संबंध, प्रशांत प्रकाशन जळगाव

२) डॉ. वसंत रायपूरकर, आंतरराष्ट्रीय संबंध,मंगेश प्रकाशन नागपूर, २००६

३) दै. महाराष्ट्र टाईम्स, २९ सप्टेंबर २०१९.

४) दै. सकाळ १९ डिसेंबर २०१९

५) https://www.unenvironment.org


Scanned by CamScanner